# Marathi Audition Script For Male(पत्रकार ) | मराठी ऑडिशन स्क्रिप्ट PDF डाउनलोड free

# पूर्वकल्पना :

एक पेशाने पत्रकार असलेल्या व्यक्ती रोजच्या सवयीप्रमाणे सकाळी उठून चहा पिताना टीव्ही चालू करून न्यूज चैनल बघत आहेत. परंतु त्याला रोजच्यापेक्षा आज टीव्हीवर काही विचित्र गोष्ट बघायला मिळाली, ती गोष्ट अशी की त्या न्यूज मध्ये सर्व पत्रकार तसेच मीडिया यांचे खूप कौतुक चाललं होत आणि हे पाहून त्याला थोडा आश्चर्य वाटलं की कधी नव्हे ते आज असं का?

# वेळ:

2 मिनिटे 10 सेकंद.

# Marathi Audition Script For Male(पत्रकार ):

अरे बापरे !! आश्चर्य ,नवल कि चमत्कार ? नाही म्हणजे आम्ही पत्रकार आहोत ,समाजाचा आरसा कि काय ते म्हणतात ते पण आज सकाळपसुन  तर  जरा जास्तच कौतुक उतू चाललंय आमचं. एरवी कधी यांना दारातून हाकलून देता येईल हेच चाललेलं असत.

तरी नशीब एखात दोन कायदे कानून आमच्या बाजूने आहेत,नाहीतर आम्हाला कोण विचारणार पण नाहीत.आम्ही समाजाचं काहीतरी देणं लागतो अर्थात आम्हाला काहीतरी करणं भाग आहे ,आणि आम्ही प्रामाणिक पणे प्रयत्न हि करतो.
मान्य आहे कि एखात दुसरा कोणीतरी असतो जो स्वताचा स्वार्थ बघतो ,पण काहीजण जिवच्या आकांताने कामं करणारे सुद्धा आहेतच की.

समाजमाध्यम मुळात लोककल्यानासाठी,  त्यावर लोकांचे प्रश येउद्या हो, अजूनही तळागाळात कित्तेक लोकांचे प्रश्न् आहेत .आमच्यासारख्याने एखाद्या प्रश्नावर बोट ठेवलं तर कुठून तरी उच्च दाबाचा पट्टा निर्माण होतो आणि त्याखाली ती बातमी आणि आमची पत्रकारिता दोनी दाबले जातात.

तुमचे सण, तुमची लग्न,येणारे पक्ष ,जाणारे पक्ष,लोकांचे प्रश्न,रस्ते,नदी,नाले,शहर ,गाव ,पंचायत,तालुका,जिल्हा ,राज्य,राष्ट्रीय आंतर राष्ट्रीय स्तरावर माझा पत्रकार बांधव कामं करतोय.

विनंती एवढीच आहे कि फक्तं आमच्याकडे या कामापुरत बघू नका ,एक माणुस म्हणून बघा मग बघा या समाज्याच्या काना कोपऱ्यात घुसून सामन्यातल्या सामान्य माणसाचे प्रश्न् लोकांसमोर आणतो ते.

असो मि बोलत बसलो तर असाच बोलत बसेन ,कारण सामान्य माणसाच्या प्रश्नाना कुठेही पूर्णविराम नसतो फक्त् स्वल्पिवराम असतो एक संपला कि दुसरा आहेच...

आज नवीन निवडणूक लागतेय वाटतं त्याचीच हि लघबघ बाकी काही नाही.
चला आवरा आपल्यालाही जायचं आहे नाहीतर बातमी कोण कव्हर करणार. शेवटी म्हणतात ना ते आलिया भोगासी असावे साधन. चला ..